**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ०५ फेब्रुवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावाला राज्यसभेत उत्तर; देशाच्या सर्वांगीण विकासाचा उल्लेख.**
2. **भारतातील पहिल्या सहकार तत्वावर आधारित 'भारत टॅक्सी'चं केंद्रीय सहकारिता मंत्री अमित शहा यांच्या हस्ते उद्घाटन.**
3. **चंद्रपूर महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी एकूण १० नामनिर्देशन पत्रे दाखल.**
4. **14 व्या हरित ऊर्जा शिखर परिषदेत महावितरणचा हरित ऊर्जा आणि ऊर्जा कार्यक्षमता उत्कृष्टता पुरस्काराने गौरव.**
5. **गडचिरोलीत आज कोया कृषी कुंभ महोत्सवाची सुरवात.**

**आता सविस्तर बातम्या** .......

पंतप्रधान / राज्यसभा

गरीब, मध्यमवर्गीय, शेतकरी आणि महिलांसह समाजातील सर्व घटकांचा विचार करत विज्ञान, तंत्रज्ञान आणि कृषी प्रौद्योगिकी क्षेत्रातील प्रगतीचा, राष्ट्रपतींनी अभिभाषणात सविस्तर आढावा घेतल्याचे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. ते राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावाला उत्तर देत आहेत.

देशातील युवा शक्ती भारताच्या सामर्थ्याला कशा प्रकारे बळ देत आहे, याचाही उल्लेख अभिभाषणात झाल्याचं त्यांनी सांगितलं. प्रत्येक घटकाच्या योगदानावर आधारित भारताच्या उज्ज्वल भविष्यास राष्ट्रपतींनी मांडलेली दृष्टी प्रेरणादायी असल्याचं मोदी म्हणाले. विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आता अधिक गतिमानपणे पुढे जाण्याची गरज असल्याच त्यांनी स्पष्ट केल. दरम्यान, पंतप्रधानांच्या संबोधनादरम्यान विरोधकांकडून घोषणाबाजी सुरू होती.

आभारप्रस्ताव लोकसभा

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरचा आभार प्रस्ताव आज लोकसभेनं आवाजी मतदानानं मंजूर केला. राष्ट्रपतींनी २८ जानेवारी रोजी संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला संबोधित केलं होतं. आभार प्रस्ताव मंजुरीचा प्रस्ताव भाजपा खासदार सर्बानंद सोनोवाल यांनी मांडला, त्याला तेजस्वी सूर्या यांनी अनुमोदन दिलं. त्याआधी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी केलेल्या घोषणाबाजीमुळे आज लोकसभेचं कामकाज दुपारी बारा,दुपारी दोन आणि नंतर दुपारी तीन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. सभागृहाचं आजचं कामकाज सुरू झाल्यावर सभापती ओम बिर्ला यांनी विरोधी पक्षाच्या सदस्यांच्या कालच्या वर्तनावर नापसंती व्यक्त केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे काल राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरल्या आभार प्रस्तावावरच्या चर्चेला उत्तर देणार होते, मात्र भाषण सुरू होण्यापूर्वीच विरोधी पक्षाचे सदस्य घोषणाबाजी करत सत्ताधारी बाकांकडे धावले. हे वर्तन सभागृहाच्या मर्यादेचं उल्लंघन असल्याचं सभापती म्हणाले. दरम्यान राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांना सभागृहात माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांच्या पुस्तकातला मजकूर वाचून दाखवायची परवानगी नाकारण्यात आली. त्यामुळे विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभात्याग केला.

अमित शाह/ भारत टॅक्सी

केंद्रीय गृह आणि सहकारिता मंत्री अमित शहा यांनी आज नवी दिल्ली इथं भारतातील पहिल्या सहकारी-आधारित राइड-हेलिंग प्लॅटफॉर्म 'भारत टॅक्सी' चं औपचारिक उद्घाटन केलं. भारत टॅक्सी ही बहुराज्य सहकारी संस्था अधिनियम, 2002 अंतर्गत नोंदणीकृत भारतातील पहिली सहकारी नेतृत्वाखालील राइड-हेलिंग सेवा आहे. हा प्लॅटफॉर्म कोणतेही कमिशन किंवा अतिरिक्त शुल्क न आकारता मूल्य निर्धारण मॉडेलवर कार्यरत असून त्याचा थेट लाभ

चालकांना मिळतो. परदेशी गुंतवणुकीवर आधारित एग्रीगेटर प्लॅटफॉर्म्सना हा एक स्वदेशी पर्याय आहे. सरकार टॅक्सी सेवा क्षेत्रात प्रवेश करत नाही, तर सहकारी संस्था या क्षेत्रात सहभागी होत आहेत असं अमित शहा यांनी याप्रसंगी सांगितलं. सहकारी टॅक्सी सेवा चालकांना पाठबळ देईल, त्यांचे उत्पन्न वाढवेल आणि त्यांच्यासाठी समृद्धी आणेल, असं देखील ते म्हणाले. या कार्यक्रमादरम्यान, परिचालन एकात्मता, डिजिटल सशक्तीकरण, सुरक्षा आणि सेवा वितरण अधिक बळकट करण्यासाठी प्रमुख सार्वजनिक आणि खासगी हितधारकांसोबत नऊ सामंजस्य करार करण्यात आले.

महापौरपद-चंद्रपूर

चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदाच्या निवडीसाठी नामनिर्देशन दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून, सकाळी ११ ते दुपारी ३ या निर्धारित कालावधीत महापौर पदासाठी एकूण १०, तर उपमहापौर पदासाठी ६ नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यात आली आहेत. महापौर पदासाठी दाखल झालेल्या नामनिर्देशनांमध्ये भारतीय जनता पार्टीकडून ५, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसकडून ४, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून १ नामनिर्देशन दाखल झाले आहे. दरम्यान चंद्रपूर महापालिकेतील राजकीय तिढा अखेर सुटला असून महापौरपद काँग्रेसकडेच राहणार आहे. काँग्रेस गटनेतेपदी विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांचे समर्थक राजेश अडूर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर उपमहापौर पदासाठी वसंत देशमुख यांनी अर्ज दाखल केला आहे. याबाबत आज विजय वडेट्टीवार यांनी नागपुरात पत्रकारांशी संवाद साधला----

आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून देखील महापौर पदी अर्ज दाखल करण्यात आला आहे. उपमहापौर पदी देखील खासदार धानोरकर यांच्या समर्थकांकडून अर्ज दाखल करण्यात आला आहे. याबाबत चर्चा होऊन अर्ज मागे घेण्यात येईल असं वडेट्टीवारांनी स्पष्ट केलं. दरम्यान चंद्रपूरच्या जनतेन काँग्रेसला कौल दिला आहे. चंद्रपुरात काँग्रेसचा महापौर होणार,चंद्रपूरच्या विकासासाठी काँग्रेस काम करणार असा निर्धार महाराष्ट्र काँग्रेसचे विदर्भ प्रभारी कुणाल चौधरी यांनी व्यक्त केला.

जिल्हा परिषद निवडणूक

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा प्रचार आज संपत आहे. येत्या शनिवारी, सात तारखेला मतदान होणार असून, नऊ तारखेला मतमोजणी होईल.

सर्वपक्षीय श्रद्धांजली

दिवंगत अजित पवार यांच्या अस्थि कलशाची रथयात्रा आज यवतमाळ मध्ये काढण्यात आली. अस्थिकलश बळीराजा चेतना भवन इथं दर्शनासाठी ठेवला गेला. यावेळी आयोजित सर्वपक्षीय श्रद्धांजली सभेत पालकमंत्री संजय राठोड, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, काँग्रेस नेते माणिकराव ठाकरे आदींनी आपल्या शोकसंवेदना व्यक्त करीत अजित दादांच्या आठवणींना उजाळा दिला.

महावितरण

स्वस्त आणि शाश्वत वीज पुरवठ्यासाठी महावितरणन अपारंपरिक ऊर्जेला प्राधान्य देत वीज खरेदीच्या दीर्घकालीन करारांमध्ये तब्बल ६५ टक्के अपारंपरिक ऊर्जेचा समावेश केला आहे. यासह इतर कामगिरीची दखल घेऊन १४ व्या हरित ऊर्जा शिखर परिषदेत महावितरणला हरित ऊर्जा आणि ऊर्जा कार्यक्षमता उत्कृष्टता पुरस्कारान गौरविण्यात आलं आहे. नवी दिल्ली येथे काल इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीन आयोजित या शिखर परिषदेत महावितरणचे कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर तसच मोहन मुजूमदार आणि शुभम चोरमले यांनी हा पुरस्कार स्वीकारला. राज्याच्या वीज क्षेत्रात सन 2030 पर्यंत तब्बल ३८ हजार मेगावॅट हरित ऊर्जेसह ४५ हजार मेगावॅट विजेची आणखी भर पडणार आहे. त्यामुळे नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होईल. तसच सुमारे ३ लाख ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून सुमारे ७ लाख रोजगार निर्माण होणार असल्याचं महावितरण द्वारा कळविण्यात आलं आहे.

कोया कृषी कुंभ

गडचिरोली इथं कृषी विभाग आणि 'आत्मा' यांच्या संयुक्त विद्यमाने 'कोया कृषी कुंभ' महोत्सवाची सुरवात राज्याचे कृषी आणि वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते करण्यात आलं .'शाश्वत शेती-समृद्ध शेती' हे राज्य सरकारच धोरण असून शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीकडे वळाव, असं आवाहन जयस्वाल यांनी केल. यावेळी विविध कृषी योजनांच्या लाभार्थींना धनादेशांचे वितरण करण्यात आले.पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवात कृषी अवजारे, यंत्रसामग्री, विविध धान्य आणि खाद्यपदार्थांचे स्टॉल तसच तज्ज्ञांची व्याख्यान आयोजित करण्यात आली आहेत.

निलंबन विषबाधा

गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यातील लाहेरी इथल्या शासकीय आश्रमशाळेत विषबाधेच्या घटनेप्रकरणी मुख्याध्यापक डी.जी.रापंजी आणि वसतिगृह अधीक्षक एम. एम. पाटील यांना निलंबित करण्यात आल आहे. या घटनेत ६० हून अधिक विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडली होती.तपासणी दरम्यान स्वयंपाक गृहात तीव्र अस्वच्छता आणि सडलेले अन्नसाठे आढळून आले. या प्रकरणी सहा कर्मचाऱ्यांची वेतनवाढ एक वर्षासाठी रोखण्याची कारवाई करण्यात आली आहे.

*****